१९२०
ग्रं. सं. ठाणें
विषय
अं. क्र. ६८

REFBK-0001868
REFBK-0001868

# श्री गोकर्ण क्षेत्र वर्णन.

भाग २ रा. (श्रीगोकर्ण क्षेत्राचे नकाशासह)

म. ग्रं. सं. ठाणे
विषय धर्म-प्रवास
सं. नं.





REFBK-0001868

हा क्षेत्राला गोकर्ण म्हणतील; हें महाक्षेत्र होईल.

आवृत्ती. १ प्रती. २००० माघ शु॥ १ श. १८४२

किंमत ४ आणे.

लेखकः—

ज. बा. जोशी पालशेतकर.

# -: हेतू :-

श्रीगोकर्णक्षेत्र वर्णन ( भाग १ ला ) ही कृती जनतामातेला प्रीय होऊन शके १८४१चे शिवरात्रीला काढलेली १ आवृत्ती अवघी ४ दिवसांत संपून दुसरी आवृत्तीही काढावी लागली. ती प्रीयता जाणून जनतामातेचे व श्रीगोकर्णस्थ–महाबलेश्वराचे चरणीं ही दुसरे भागाची कृती लेखक ठेवीत आहे. हंसक्षीरन्यायानें दोष टाकून सद्भावानें लिहिलेलें मर्म घ्यावें. या भागांतील कथानकसूत्रांस सर्व आधार व मदत गोकर्णमहात्म्याचा असून रा. कायकेणी यांनीं केलेल्या गोकर्णमहात्म्याचाही आहे; त्यांचाही लेखक आभारी आहे. यात्रावंतांचे सोईकरितां या भागांत गोकर्णक्षेत्राचा लहानसा नकाशाही दिला आहे. **सर्वांच्या बुद्धी गोकर्णस्थ–महाबलेश्वराकडे** वळोत इतकाच लेखकाचा हेतू आहे.

श्री शके १८४२
माघ शु॥ १ } ज. वा. जोशी पालशेतकर.

लेखक व प्रकाशक:—ज. वा. जोशी पालशेतकर.

सर्व प्रकारचे हक्क लेखकाने स्वाधीन राखिले आहेत.

——:o:——

# श्रीगोकर्ण क्षेत्र वर्णन.

## भाग २ रा.

१ **श्रीगोकर्ण**–या क्षेत्राला ३ नांवें आहेत. १ **गोकर्ण.** २ **रुद्रयोनी.** ३ **वरुणावर्त.** यांतील पहिलीं २ नांवें श्रीशंकरांनीं व ३ रें श्रीपरशुरामानें ठेविलें आहे. १ **श्रीगोकर्ण.** एका प्रलयानंतर सृष्टीचे पुनर्रचनेबद्दल विचार करण्याकरितां ब्रह्मा–विष्णू–महेश यांची सभा जमली व रचनाविचार ठरला. त्याचे सिध्यर्थ श्रीशंकरांनीं पातालांत जाऊन समाधी लाविली. समाधींत बराच काळ गेला. हें पाहून ब्रह्मदेवानें श्रीविष्णूचे सहाय्यानें सृष्टी व सृष्टीकर्मे सुरू केलीं. समाधीविमोचनानंतर श्रीशंकरांनीं हें पहातांच रागानें संतप्त होऊन सर्व संहाराची इच्छा धरली व वेगानें वर येऊं लागले. पृथ्वीनें त्यांचें क्रोधरूप पाहून भीतभीतच त्यांची स्तुती केली व माझें रक्षण करा अशी प्रार्थना केली. तेंव्हां श्रीशंकरांनीं अभय वर दिला व म्हटलें–" मी तुझे कर्णांतून लहान रूपानें वर निघून जाईन; तुला त्रास होणार नाहीं. " पृथ्वीनें त्यांचें म्हणणें कबूल केलें व गोरूप धरिलें. श्रीशंकर तिच्या कर्णांतून अंगुष्ठमात्र रूपानें बाहेर पडून वर गेले व तिला आशिर्वाद दिला. " या स्थानाला **गोकर्ण** म्हणतील; हें महाक्षेत्र होईल. मला वर येण्यास हें स्थान योनिरूप झालें, म्हणून याला **रुद्रयोनी** असेंही म्हणतील. " ३ **वरुणावर्त.** एका प्रलयांत वरुणानें मर्यादा उल्लंघन करून गोकर्ण क्षेत्राचा भाग जलमय केला; त्यावेळीं क्षेत्रस्थ मुनींनीं परशुरामानें सह्याद्रीचे पृष्ठभागावर यज्ञ सुरू केला होता, तेथें जाऊन त्याची प्रार्थना केली; व गोकर्णक्षेत्रास

श्रीशंकरांनीं दिलेला आशीर्वाद व क्षेत्रभागाची वरुणाकडून झालेली हानीही सांगितली. श्रीपरशुरामानें गोकर्णास येऊन वरुणाशीं युद्ध करून त्यास पराजित केलें; त्यावेळीं वरुणानें परशुरामाची प्रार्थना करून " मजकडून क्षेत्रभागास पुनरपि त्रास होणार नाहीं;" असें निश्चयपूर्वक सांगितलें; तेव्हां श्रीपरशुरामांनीं या क्षेत्राला **वरुणावर्त** असें नांव ठेविलें.

२ **महाबलेश्वर**–आईचे तोंडून आत्मलिंगाची हकीगत ऐकून तें मिळवून आणण्याची महत्वाकांक्षा रावणानें धरली व कैलासावर जाऊन श्रीशंकरापुढें घोर तपश्चर्या केली. श्रीशंकर प्रसन्न होतांच आत्मलिंग मागितलें. श्रीशंकरांनीं तें देऊन सांगितलें " लंकेंत जाण्यापूर्वी हें भूमीवर ठेऊं नको; ठेविल्यास तेथेंच स्थिर होईल. " रावण आशिर्वादपूर्वक आत्मलिंग घेऊन लंकेकडे जाऊं लागला. पण सत्वाचे अभावामुळें देवांस निर्बलत्व प्राप्त झालें. त्यांनीं बलप्राप्तीकरितां आत्मलिंगप्राप्तीचा मार्ग श्रीविष्णूचे व श्रीगणेशाचे द्वारें धरिला. श्रीगणेशानें रावणास गोकर्णानजीक बटूवेषानें गांठलें; इतक्यांत श्रीविष्णूंनीं सूर्याआड सुदर्शन धरून रावणाला संध्याकाळ भासविला. ब्रह्मकर्मनिष्ठ रावणानें संध्यावंदनाचेवेळीं शिववचनाप्रमाणें वागतां यावें म्हणून तें आत्मलिंग जमिनीवर न ठेवतां बटुरूप गणेशाजवळ दिलें; श्रीगणेशानें तें तेथेंच स्थिर केलें. तें पाहून रावण खिन्न होऊन लंकेकडे गेला. इंद्रानें देवांच्या सहाय्यानें आत्मलिंगाची अर्चापूर्वक स्थापना केली. सर्वांस बलप्राप्ती झाली. सर्वांनीं बलदाता **महाबलेश** म्हटलें.

३ **रुद्रभूमि**—गोरूपपृथ्वीला श्रीशंकरांनीं आशिर्वाद दिला; पण संहारइच्छेनें येथें उभें राहून सर्व पार्षदगणांस संहार आज्ञा दिल्या; पण श्रीविष्णूंनीं त्यांची समजूत करून राग शांत केला. श्रीशंकरांची विश्वदाहकशक्ती–जणूंकाय क्रोधरूप अग्नि या-

भूत मूर्तिमंत आहे. अजूनही येथील महात्म्य पहावयास मिळतें. येथें दहन केल्यास मुक्ती मिळते असें शास्त्रवचन आहे. हें स्थान मुख्य देवालयाचे ईशान्येस नजीकच आहे.

**४ सागरेश्वर**--श्रीपरशुरामांनीं सागरास पराजित केल्यावर सागरानें येथें येऊन शिवव्रत आचरलें व लिंग स्थापिलें. येथें श्रावणांतील श्रवण नक्षत्रीं शिवपूजाव्रत करणारांस राजसूययज्ञाचें फल मिळतें. हें स्थान मुख्य देवालयाचे पश्चिमेस पूर्वाभिमुख आहे.

**५ जमदग्न्येश्वर**—श्रीपरशुरामांनीं सागरास जिंकल्यावर येथें तपाचरण करून लिंगस्थापना केली; व त्यास वडिलांचें नांव दिलें. येथें वैशाख शु॥ १५ ला पूजा, धर्म, तप करणारांस विशेष पुण्य मिळतें.हें स्थान मुख्य देवालयाचे नजीकच पूर्वाभिमुख आहे.

**६ इंद्रेश्वर**—गौतमाचे शापांतून मुक्त होण्याला इंद्रानें येथें येऊन तप केलें. व लिंग स्थापिलें. तीर्थ देवालयाचे प्राकाराचे आंतील बाजूस आहे. हें स्थान देवालयाचे दक्षिणमहाद्वारा बाहेर आहे.

**७ श्रीगणेश**—हें स्थान इंद्रेश्वराचे दक्षिणेस नजीक आहे.बटुवेशानें आत्मलिंग स्थिर करून सर्वांस सुख व बल दिलें. तेंच द्विभुजबालगणेशरूप भक्तांस सुख देण्यास सज्ज आहे. भाविकांस रावणानें त्यांना दिलेली मस्तकावरील मुष्टिप्रहाराची खूण अद्यापही पहावयास मिळते. महाबलेश्वराचे पूजेआधीं यांची पूजा करावी लागते; नाहींतर महाबलेशपूजेचें फल मिळत नाहीं. अग्रपूजेचा बहुमान आत्मलिंगार्चनाचे वेळीं सर्व देवांकडून मिळविलेला आहे. भाद्रपद शु॥ ४ स पूजा विशेष पुण्यप्रद आहे.

८ **मार्कंडेश्वर**—मार्कंडेयानें येथें रुद्रगायत्री जपून यमाला हटविण्याचें सामर्थ्य अंगीं आणलें. लिंग स्थापना केली. हें स्थान मुख्य देवालयाचे नजीक पूर्वेस आहे.

९ **गुहतीर्थ**—हें तीर्थ षडाननानें श्रीशंकरमुखांतून गोकर्ण-महात्म्य ऐकून तपाचरण करण्याचे वेळीं स्थापलें व लिंगही स्थापलें. त्यास **कुमारेश्वर** म्हणतात. येथें कार्तिक शु॥ १५ किंवा कृत्तिकानक्षत्रीं शिवपूजा करणारांस फार पुण्य मिळतें. हें मुख्यदेवालयाचे पूर्वेस नजीक आहे.

१० **ताम्रगौरी**—ताम्रगंगा तटाकीं पूर्वाभिमुखी आहे. जवळच तीर्थ आहे; तेथें पिंडदान करणारांचे पूर्वज मुक्ती पावतात. याच तीर्थांत मृतांच्या अस्थी टाकण्याची शास्त्राज्ञा आहे. त्यांसही मुक्ति मिळते.

११ **ताम्रदलगिरी**—भृगुऋषीनें अग्नीला शाप दिला. त्याचे शांत्यर्थ अग्नीनें येथें येऊन शिवव्रत केलें; लिंग व तीर्थ स्थापलें. या पर्वतावर अग्नीनें तप केल्यामुळें भर पर्जन्यकाळींही झाडें होत नाहींत. येथूनच ताम्रगंगेचा उगम होतो. लिंगास कानडी-नांव बंकनाथेश्वर असें आहे. कार्तिक शु॥ १ ला येथें शिवव्रत, जप, तप, होम, वगैरे करणारांस फार पुण्यप्राप्ती होते.

१२ **पापस्थालेश्वर**<br>
१३ **अमृतेश्वर** } हीं स्थानें मुख्य देवालयाचे पश्चिमेस पूर्वाभिमुखी आहेत. तेथेंच ताम्रगंगानदी सागरास मिळते; त्याठिकाणींच पापस्थालीतीर्थ आहे. पापस्थालीश्वरालाच **विधूत-पितृस्थालीश्वर** किंवा **विधूत-पापस्थालीश्वर** म्हणतात. **अमृतेश्वर** हें स्थानही प्रेक्षणीय आहे. माघ कृ-१४ ला येथें पितृकार्यें व शिवव्रत करणारांस अपार- पुण्यलाभ होऊन पितरांस मुक्ती मिळते.

१४ गोविल–श्रीकामधेनूनें येथें शिवव्रत केलें. हें स्थान पाहिलेले लोक अद्यापही आहेत. श्रीशंकर–दर्शनानें पावन झालेल्या; कामधेनूचे पदरेणू मिसळलेल्या या स्थानात चैत्रमासांत अगर तुला संक्रांतींत, किंचिद्दान केल्यासही महद्भाग्य मिळतें.

१५ **सरस्वतेश्वर**–हें स्थान अमृतेश्वराचे पूर्वेस असून जवळच सरस्वती कुंड आहे. येथेंच आत्मलिंगप्रतिष्ठेनंतर सरस्वतीनें शिवस्तवन केलें. भाद्रपद शु॥ ९ ला येथें शिवव्रतकरणारांची वाणी यशवती होते.

१६ **सावित्र्येश्वर** } हीं स्थानें मुख्य देवालयाचे दक्षिणेस आहेत.
१७ **गायत्र्येश्वर** } येथें गायत्री व सावित्री यांनीं शिवव्रत व तप केलें. अद्यापिही येथें गायत्रीजप व शिवार्चन करणारांस अनंत पुण्य मिळतें.

१८ **नागेश्वर**– येथें नागराजानें स्थापिलेलें नागतीर्थहीआहे. नागराजानें शिवव्रत करून मातृ-शाप निष्फळ केला. श्रावण शु॥ ५ ला येथें नाग व नागभूषणशंकर यांची पूजाअर्चा केल्यास पितर मुक्त होतात; सर्पशापितपितरांचाही उद्धार होतो, हें स्थान मुख्य देवालयाचे दक्षिणेस थोडया अंतरावर आहे.

१९ **वरदेश्वर**–शतशृंग पर्वत आणतानां गरुड थकून मरणोन्मुख झाला; त्यावेळीं अगस्तीनें त्याला अभय देऊन वांचविलें व पर्वतही स्थीर केला. त्यावेळीं गरुडानें वरदेश्वरलिंग व गरुडतीर्थ हीं स्थापिलीं व शिवाराधना केली. हें स्थान रुद्रयोनीचे दक्षिणेस तपोवनांत आहे.

२० **अगस्त्येश्वर**–अगस्तीमुनींनीं येथें तप करून लिंग व तीर्थ स्थापिलें. हें मुख्य देवालयाचे दक्षिणेस आहे. येथें आश्विनमासांतील आर्द्रानक्षत्रीं शिवव्रत केल्यास चित्तशांती व पुण्यलाभ होतो.

२१ **ब्रम्हकमंडलु**–शतशृंगपर्वत गरुडानें येथें आणून टाकिल्यावर ब्रम्हदेवांनी सर्व देवांसह त्यावर तपाचरण व शिवव्रत केलें व कमंडलुतीर्थ स्थापिलें.

२२ **गोगर्भ**–शतशृंगपर्वतावर कमंडलुनजीकच हें स्थान आहे. येथें सर्व देवांनीं कार्तिकमासीं शिवव्रत केलें. यांत जाणें अशक्तांस व वृद्धांस अवघड आहे. यांत इतर लेण्यांप्रमाणें सुंदर कोरीवकाम जरी नाहीं; तरी येथून गोकर्ण क्षेत्राचा बहुतेक भाग व समीपचे सागराचा अपार पसारा पाहून मन प्रसन्न होतें. येथें शिवव्रत करणारांस गर्भवास प्राप्त होत नाहीं. येथेंच कामधेनूनें ब्रम्हदेव व शंकर यांची भक्ति केली.

२३ **कोटीतीर्थ**–शतशृंगपर्वत गरुडानें उचलून आणतांना त्यावर २ कोटी तीर्थें व १४ हजार मुनी तपश्चर्या करीत होते. तीं तीर्थें एकत्र होऊन त्यांचेंच हें कोटीतीर्थ झालें. यांत स्नानकरणारांस दहा अश्वमेधयज्ञांचें पुण्य मिळतें. यांत **कोटेश्वर** नांवाचें स्थान आहे. कार्तिकशुद्ध ॥ १५ व शिवरात्रीला यांत महाबलेश्वर जलविहारास जातात.

२४ **विशालबिल**–हें शतशृंग पर्वतावर गोगर्भानजीक आहे कर्णधारानें विशाल नांवाचे राजास शाप दिल्यामुळें हें झालें आहे. येथून नागराजा समुद्रांत येत जात असे. विशाल शिलारूप आहे. सर्पराजाचे जाण्यानें विशालाचे अंगावर रेषा उमटलेल्या आहेत.

२५ **गंगाधार**– येथें सुमित्र ब्राह्मणानें अपार शिवभक्ती केली; त्यावेळीं श्रीशंकरांनीं हें तीर्थ निर्माण करून त्याला दिलें. येथें जातानां **वसिष्ठेश्वर** व **वसिष्ठतीर्थ**; **अगस्त्येश्वर** व **अगस्तीतीर्थ** हीं वाटेंतच आहेत. येथून जवळच **भीमकुंड** ह्मणून प्रेक्षणीय स्थान आहे, त्यांत स्नान करणारांस चतुर्विध मोक्षप्राप्ती होते. येथें श्रीमहाबलेश्वराची स्वारी कार्तिक शु॥ १५ ला जाते त्यावेळीं

मोठा उत्सव असतो. कार्तिक शु॥ १२ ला गंगाधारांत स्नान करणारांस फार पुण्यप्राप्ती होते.

२६ **वैतरणीह्रद व उन्मज्जनोतीर्थ**–.हीं कोटीतीर्थाचे पूर्वेस आहेत. पर्जन्य काळाशिवाय यांत स्नान करण्याची सोय नाहीं. वैतरणीला सागरानें शाप दिल्यामुळें ती कोटितीर्थालाच मिळते. येथें जवळच **दुर्गादेवी** व **दुर्गातीर्थ** आहे.

२७ **एलापत्र**–एलापत्र हा नागराजा होता. त्यानें तपकरून लिंग स्थापिलें. हें स्थान कोटीतीर्थासमीप आहे.

२८ **मंडपत्रय–मुक्ती, ज्ञान, वैराग्य** हीं तीन मंडपस्थानें कोटी-तीर्थासमीप आहेत. यांत मृत्यु पावणारास पुनर्जन्म नाहीं. श्रावण शु॥ १२ अगर श्रावणांतील श्रवणनक्षत्रीं येथें शिवव्रत केल्यास फार पुण्य लाभतें.

२९ **श्रीरामतीर्थ**–दाशरथी रामानें राक्षस व त्यांचा राजा रावण यांस मारून सर्वांस सुखी केलें; पण त्यांत ब्राह्मणवधाचें पाप आपले हातून घडलें त्याचे निरसनार्थ येथें शिवव्रत केलें व तीर्थ स्थापिलें. हें स्थान गोकर्णग्रामाचे दक्षिणेस सागरासमीप आहे. येथें अजूनही प्रातःकालीं लोक स्नान, जप, तप, करतांना पाहून पूर्वयुगाचा भास होतो. तीर्थ–निर्झर मोठ्या डौलानें पडत असतो. स्नानानें शरीरशुद्धी, श्रीरामदर्शनानें चित्तशुद्धी, सागरदर्शनानें परमेश्वरकृतीचें अगाधत्व, ही सौख्यत्रिवेणी एका क्षणांत आनंदाचें भरतें आणते. **भरतानें** येथें येऊन तप-केलें त्याचीही **गुंफा** नजीकच डोंगरांत आहे. चैत्र शु॥ ९ ला येथें उत्साह होतो. त्या दिवशीं तीर्थस्नान, दान, जप, तप कर-णारांस अपार पुण्य लाभतें. येथूनच **एकविंद्रादितीर्थांकडे** जाण्याला मार्ग आहे.

३० **एकबिंद्वादितीर्थचतुष्टय**–एकबिंदु, दशबिंदु, शतबिंदु, सहस्रबिंदु, अशीं ४ तीर्थें आहेत. हीं रामतीर्थाचे दक्षिणेस आहेत. येथें समुद्रतीरानेंच पण डोंगराचे अडचणींतून जावें लागतें. हे अत्रिवंशांतील ४ पुत्र असून तप करीत असतां त्यांचे देह शुष्क झाले. त्यावेळीं चंद्रानें अमृतकणांचा वर्षाव करून त्यांस नवजीवन दिलें. त्यानींच हीं चार तीर्थें स्थापिलीं. तिकडे जातांना **सोमतीर्थ, सूर्यतीर्थ, और्वमुनितीर्थ** हीं आहेत. यांपैकीं शतबिंदुतीर्थाला **भीमगदा** म्हणतात. भीमानें आपल्या अगस्त्र गदेनें या तीर्थाचा पुनरुद्धार केला.

३१ **पांडवतीर्थ**–समुद्रकिनाऱ्यानें रामतीर्थाकडे जातांना पर्वताचे मूलप्रदेशीं हें स्थान आहे. पांडव कुंतिमातेसह येथें तप करण्यास राहिले होते. यांत मार्गशीर्षमासापर्यंत स्नान करण्यास मिळतें कार्तिक शु॥ ५ ला येथें स्नानदान केल्यास अपार पुण्यप्राप्ति होते.

३२ **मणिनाग**–हें स्थान रामतीर्थाचे दक्षिणेस एकबिंद्वादितीर्थाकडे जातांना वाटेंतच आहे. येथें शेषानें तप करून सागरांत गमन केलें. यालाच **शिलानाग** म्हणतात. जवळच **अनंततीर्थ** आहे.

३३ **धर्मेश्वर**–येथें यमधर्मानें मार्कंडेयाला दुःख दिल्याबद्दल शिवकोप झाला होता त्याचे निरसनार्थ शिवव्रत केलें व तीर्थ व लिंग स्थापिलें. हें स्थान कोटीतीर्थाचे पश्चिमेला आहे. माघ शु॥ ७ ला येथें शिवव्रत करणें फार पुण्यदायक आहे.

३४ **संवर्तकेश्वर**–श्रीनारदमुनींनीं संवर्तकाला गोकर्णमहात्म्य सांगून तेथेंच त्याचेकडून तप करविलें. हें स्थान मुख्य देवालयाचे पूर्वेस वैकुंठरमणाचे देवालयाकडे जातांना वाटेंत आहे; जवळच संवर्तकतीर्थ आहे. फाल्गुनांतील फल्गुनीनक्षत्रीं येथें शिवव्रत करणें अति पुण्यप्रद आहे.

३५ **वैकुंठरमण**—हें विष्णुस्थान बटुगणेशास आत्मलिंग प्राप्तीचेवेळीं जेथून विष्णूनें सूर्याआड सुदर्शन धरून रावणास संध्याकाळ भासविला तेथेंच आहे. येथपर्यंत श्रीमहाबलेश्वराचा रथ येवून शिवविष्णू ऐक्य होऊन रथ परत फिरतो. त्यावेळची मौज पहाण्यासारखी असते.

येणेंप्रमाणें दक्षिण यात्रेंतील प्रमुख स्थलें व तीर्थें आहेत हीं बहुतेक पहाण्याला मिळतात. कांहीं शिवलिंगें लोकांचे घरांतून आहेत. तीर्थांना कांहीं ठिकाणीं आकुंचित आकार देऊन सोयीचीं केलेलीं आहेत. कांहीं शिवलिंगें पर्वतांत आहेत तीं व तीर्थस्थानें चांगलीं पहावयास मिळतात. ताम्रगंगेसारख्या पवित्रनदीची स्थिती कींव येण्यासारखी यात्रेकरूंना दिसते.

३६ **कलकलेश्वर**—रावणास आत्मलिंग लंकेंत नेतां आलें नाहीं; तें आपणास मिळालें; गोकर्णपुण्यभूमींत इंद्राचे हस्तें स्थापिलें गेलें; या विजयाचे वेळीं जो जयजयकार शब्द झाला; त्याचें दर्शक म्हणून श्रीनारदमुनींनीं याची स्थापना केली. हें महाबलेश्वरा देवालयाचे उत्तरेस शतशृंगपर्वताग्रावर आहे. येथून गोकर्णक्षेत्राचा उत्तर व दक्षिण भाग पहावयास मिळतो.

३७ **वैवाहिकपर्वत**—हा कलकलेश्वराचे उत्तरेकडे आहे. याच पर्वतावर शिव-गंगा विवाह झाला. पर्वताग्राला ३ प्रदक्षिणा करून मोठ्यानें हरोम् हरहर अगर शिवगायत्री अगर पंचाक्षरीमंत्र ह्मणतांच आकाशगंगेचे कण भाविकांस अजूनही पावन करतात.

३८ **गंगावलीनदी**—हिला दुसरें नांव **शाल्मूकिनी** असें आहे. ही गोकर्णक्षेत्राची उत्तरसीमा आहे. येथें आश्विन व॥ ८ ला मोठा उत्साह असतो. त्या दिवशीं गंगास्नानार्थ श्रीमहाबळेश्वर जातात. त्यावेळीं सागर इतका नजीक असून कांहींकाल पाणी गोड असतें; क्षार नसतें. स्नान होऊन देव देवालयांत येतांना पुष्कळ

ठिकाणीं अष्टविधसेवा चालू असते. श्रीरुद्रपादस्थानाकडून देव देवालयांत येतांच मोठा उत्साह होतो.

३९ **कपिलतीर्थ**–हें रुद्रपाददेवालयानजीक पूर्वेकडे आहे. कपिलमहामुनींनीं येथें शिवाराधन व तपश्चर्या करून सिद्धी मिळविली. श्रावण व पौष महिन्यांत अगर कपिलाषष्ठीला यांत स्नान करणरांस सिद्धी प्राप्त होतात.

४० **चक्रखंडेश्वर**–याचेंच दुसरें नांव **योगेश्वर** असें आहे. याचे तीर्थप्राशनानें, सेवेनें, भक्तीनें सर्वलोक पुण्यवान झाल्यानें यमनगरी ओस पडली अशी तक्रार यमानें श्रीविष्णूंकडे केल्या-मुळें विष्णूनें सुदर्शन चक्रानें याचें खंडन केलें. जवळच तीर्थही आहे. हें स्थान वैवाहिक पर्वतावरून गंगावलीकडे जातांना आहे.

४१ **अरण्यतीर्थ**–हें कपीलतीर्थाचे दक्षिणेस आहे. येथें माघ शु॥१५ ला स्नान केल्यास अग्निष्टोमयज्ञाचें फल मिळतें.

४२ **नादेश्वर**–हें दिव्य लिंग समुद्रमंथनांत उत्पन्न झालें. तें येथें सुनाद ब्राम्हणानें स्थापिलें;जवळच नादतीर्थ आहे.येथें शिजपूजा-करून पृथ्वीवर पायानें आघात केल्यास अजूनही नाद ऐकण्याला मिळतो. येथें कार्तिक शु॥ ११ ला पूजाविधीनें शंकरभक्ती करणां-रांस अपार पुण्य मिळतें. हें स्थान कोटीतीर्थाचे उत्तरेस आहे.

४३ **अशोकाश्रम**-प्लक्षद्वीपाधिराज अशोकानें येथें शत्रूनाशार्थ तप केलें; लिंग व तीर्थ स्थापिलें. या तीर्थांत वैशाखमासीं विशा-खा नक्षत्रीं स्नान केल्यास भीति, शोक हीं नष्ट होऊन प्राणी शिवलोकीं जातो. हें स्थान कोटीतीर्थाचे आग्नेईस सुमारें ३ मैलां-वर डोंगरांत असून एकांतस्थान आहे. या आश्रमांतच **अग्निद्यु-तितीर्थ, अग्निबाहुतीर्थ, पुरुतीर्थ, मेधातीर्थ** अशीं जवळजवळ ४ तीर्थें आहेत. हे चौघेही अशोकराजाचे पितामह होते. त्यानीं येथें घोर तप केलें होतें; त्यावेळीं हीं तीर्थें स्थापिलीं आहेत.

मं.भा.ग्रं-८३

४४ **अघनाशिनीनदी**–ही गोकर्णक्षेत्राची दक्षिण सीमा आहे. हिचें दुसरें नांव **कामाघनाशिनी** असें आहे. कामानें श्रीशंकराला त्रास दिला त्या पापाचें क्षालन होण्यासाठीं त्यानें या नदींत स्नान केलें; स्नानानें ताप–पाप रहित झाला. या सरितास्नानानें चित्तशांती मिळते. कामदेवानें स्थपिलेलें **कामेश्वर** लिंग कोटी तीर्थाचे पूर्वतटाकीं आहे.

४५ **श्लेष्मातक वन**–रुद्रयोनीचे अगदीं नजीक दक्षिणेकडे हें स्थान आहे. यांतच रावण, कुंभकर्ण, बिभीषण यांनीं ब्रह्मदेवाची भक्ती केली व वर मिळविले. त्यांनीं स्थापलेलीं लिंगें त्यांचें नावानें प्रसिद्ध आहेत. त्यांस **रावणेश्वर, कुंभकर्णेश्वर, बिभीणेषश्वर** असें म्हणतात. हीं स्थानें वेदपरायण ब्राम्हणांचे घरांत असून चांगले स्थितींत पहावयास मिळतात.

४६ **कुबेरेश्वर**—हें स्थान श्लेष्मातकवना समीप मुख्य देवालयानजीक आहे. येथें कुबेरानें तपश्चरणानें एका दिक्पालाची जागा मिळविली व तें काम करण्याची शक्तिही मिळविली. आपले सापत्न बंधूंनीं स्थापिलेले लिंगाजवळच कुबेरानें स्थापलेलें लिंग व तीर्थ पहावयाला मिळतें.

४७ **केतकीवन**—हें मुख्य देवालय व वैवाहिक पर्वत यांचेमध्यें आहे. येथें केतकीनें शिवव्रत करून श्रीशंकराला प्रसन्न केलें. यांत **केतकेश्वर, केतकीतीर्थ, केतकीविनायक** व **विनायकतीर्थ** आहे. विनायक तीर्थांत श्रावण शु॥ ४ भौमवारीं असतां अंगारकी योग होतो त्यावेळीं; स्नान, दान, तप, जप केल्यास अती पुण्यकारक आहे.

४८ **ब्रह्मदेव**–एक शिर गेल्यावर शंकराराधना करून वर मिळवून येथें मूर्तिरूपानें निराळी पूजा घेत राहिले. हें देवालय मुख्य देवालयानजीक दक्षिणेस पूर्वाभिमुख आहे. ब्रह्मदेवाची स्वतंत्र

पूजा याच क्षेत्रांत होते; अन्यत्र क्वचितच आहे. ब्रह्मतीर्थ जवळच आहे. त्यांत चैत्र शु॥ १३ ला स्नान, दान, जप केल्यास फार पुण्यप्रद होतें. ही मूर्ती कालचक्राचे तडाक्यांत भंगली आहे.

४९ **कालभैरव व घंटाकर्ण**—हीं स्थानें कोटीतीर्थाचे दक्षिण तीराजवळ आहेत. ब्रह्मदेवाचें शीर तोडल्यामुळें ब्रह्महत्या कालभैरवाचे पाठीला लागली; तिचे त्रासांतून सुटण्याकरितां त्यानें येथें शिवव्रत केलें व त्या दोषांतून मुक्त झाला.

५० **नारसिंह**—परमभक्त प्रल्हाद यानें पितृहत्या-दोष-नाशार्थ येथें शिवव्रत केलें व परमप्रिय दैवत नारसिंह व लिंग स्थापिलें. येथें वैशाख शु॥ १४ ला शिवव्रत केल्यास फार पुण्य लागतें. हें स्थान कोटीतीर्थाजवळ तीरावर आहे.

५१ **श्रीकृष्ण**-येथें शंकरभक्त बाणासुरास युद्धांत जिकून विजय मिळविण्याकरितां श्रीकृष्णानीं शिवव्रत केलें व विजय मिळविला. हें स्थान कोटीतीर्थाचेजवळ दक्षिण तीरावर आहे.

५२ **दुर्वासतीर्थ**-हें कोटीतीर्थाचे दक्षिणेकडे डोंगरांत आहे. येथें दुर्वासमुनीनीं घोर तप केलें. कार्तिक शु॥ ९ ला यांत स्नान दान करणारांस अपार पुण्यप्राप्त होऊन सिद्धी प्राप्त होतात.

५३ **दत्तात्रेयतीर्थ**-हें वैकुंठ रमणाचे देवालयाकडून भद्रकालीचे देवालयाकडे जातांना वाटेंत आहे. **दत्तस्थान रुद्रयोनींत** आहे. येथें श्रीदत्तानें थोर तप केलें.

५४ **चतुर्वेदाश्रम**-चारी वेदांनीं शंखासुराचे सपाट्यांतून मुक्त होतांच येथें तपकरून आपापले नांवानें लिंगें स्थापिलीं, हीं सर्व श्रीगणेश देवालयनजीक दक्षिणेकडे आहेत, त्यांस हल्लींही वेदश्रवण घडतें.

५५ **शास्त्रेश्वर**-हें स्थान रुद्रयोनींतच पूर्वाभिमुख आहे, **याळाच साक्षेश्वर ह्मणतात.**

५६ **व्यासाश्रम**–हा कोटीतीर्थाचे ईशान्येस डोंगरांत आहे, यांत **व्यासतीर्थ**, **शुकतीर्थ** हीं तीर्थें आहेत. येथेंच व्यासांनीं शंखासुराचे सपाटयांतून सुटलेल्या वेदांचीं व शास्त्रांचीं अव्यवस्थीत अंगें व्यवस्थीत केलीं. श्रीशुकमुनीनीं येथें तपकरून ज्ञान सिद्धी मिळविली. माघमासीं व मकरसंक्रांतीला या तीर्थांत स्नान केल्यास, शास्त्रप्रवचन केल्यास अपार पुण्य लाभतें.

५७ **मणीभद्र**–हे–महासिद्ध होते. शंकराचे पार्षदगण होते, त्यांनीं येथें तप करून आनंदानें गोकर्ण क्षेत्राचे दक्षिणदिशा-पालकाचें काम पतकरून राहिले. हें स्थान गोकर्ण ग्रामाचे दक्षिण टोंकास शैलाग्रावर आहे, यालाच **माणकेश्वर** ह्मणतात. येथून गोकर्ण क्षेत्र व सागरपसारा पाहून मोठा आनंद वाटतो.

५८ **विश्वकर्मेश्वर**–मयासुराहून उच्च प्रतीची शिल्पविद्या प्राप्त व्हावी म्हणून विश्वकर्म्यानें येथें तप करून लिंग स्थापलें. हें कोटीतीर्थाचे उत्तर तीरावर आहे. वैशाख शु ॥ ३ ला येथें तप केल्यास फार पुण्य मिळतें.

५९ **गौतमेश्वर**–ब्रम्हतनया अहिल्या हिचे विरहाचें दुःख गौतममुनींनी येथें [illegible]न तपाचरणानें कमी केलें. रुद्रयोनीचे नैऋत्येस त्यांनीं स्था[illegible]लें लिंग व तीर्थ आहे. भाद्रपद शु ॥९ ला येथें शिवव्रत करणारांस फार पुण्य मिळतें.

६० **कश्यपाश्रम**–हा मुख्य देवालयाचे दक्षिणेस सुमारें १ मैला-वर आहे. यांत **कश्यप**, **सुरसा** ( नागराज माता ), **कपोत**, **केसरी** ( हनुमंत पिता ), **तृणाग्नि** ( कश्यप पुत्र ), यांनीं तपाचरण करून तीर्थें स्थापिलीं. तेथून एक बिंद्वादितीर्थाकडे जातांना **वसुधारा** तीर्थ लागतें. हें अगदीं एकांत स्थान आहे.

६१ **नवग्रहाश्रम**–हा कोटीतीर्थाचे दक्षिणेस सुमारें २ मैलां-वर आहे. हें एकांत स्थान समुद्रासमीप आहे. येथें नवग्रहांनी

तपाचरण केलें; त्यांनीं स्थापिलेलीं लिंगें व तीर्थें आहेत. याच आश्रमांत **भृगु, जमदग्नि, पुलस्त्य, अंगिरस, अत्रि** यांनीं तपाचरण करून तीर्थें स्थापिलीं आहेत. येथून पुढें आग्नेयीकडे समुद्रकांठानें जातानां **भरद्वाजतीर्थ**, नंतर पुढें अगदीं टोंकावर **नारदतीर्थ** लागतें. येथें नारदांनीं ब्रम्हवीणेचे स्वराबरोबर ईशस्तुती गाईली. हें स्थान गोकर्ण क्षेत्राचें आग्नेयीकडचें शेवट आहे. एकांतस्थान व सागर–समीपता हें पाहून मन प्रसन्न होतें.

६२ **गंधर्वाश्रम**–याचें दुसरें नांव हडिकेरी असें आहे. नवग्रहाश्रमांतून पूर्वेचा डोंगर चढून ईशान्येकडे जातांना हा आश्रम आहे. यांत **विश्वावसु, चित्रसेन, तुंबरुस्वामी वगैरे** गंधर्वांनीं व अप्सरांनीं स्तुतीपद्यें गाऊन, नर्तन करून शंकराला प्रसन्न केलें. त्यांनीं ठिकठिकाणीं स्थापिलेली लिंगें व तीर्थें आहेत. **किंनरतीर्थ, किंपुरुषतीर्थ** हीं स्थानें डोंगराचे उतरणीवर व **गुहकतीर्थ** व **विद्याधरतीर्थ** हीं समुद्रानजीक आहेत.

६३ **वाल्मीकतीर्थ**–हें अशोकाश्रमांतून थेट पूर्वेस डोंगराचे उतरणींत आहे. येथें वाल्मीकांनीं तपाचरण केलें व सिद्धी मिळविली. चैत्र शु॥ ५ ला येथें शिवव्रत करणारांस फार पुण्य लाभतें.

६४ **व्याधतीर्थ**–हें स्थान दुर्मुख नांवाचे व्याधानें स्थापलें. तो अमानुष कृत्यें करणारा व मनुष्यमांसभक्षक होता. पण अनुतापानें शिवव्रत करून तीर्थ स्थापून उत्तम गतीला गेला. हें स्थान श्रीभद्रकालीचे देवालयाचे ईशान्येस सुमारें ॥- मैलावर आहे.

६५ **हनुमंतेश्वर**–श्रीरामभक्त हनुमंतानें येथें तप केलें व लिंग स्थापिलें. कोटीतीर्थाचे दक्षिण तीरावर नारसिंहा जवळ हें स्थान आहे.

६६ **श्रीभद्रकाली**–हें देवीचें महास्थान दक्षिणाभिमुखी आहे. वेत्रासुरादि दैत्यांचा संहार करून श्रीशंकरांचे आज्ञेनें सर्व रोगांसह

देवी गोकर्ण क्षेत्राला त्रास होऊं नये म्हणून राहिली आहे. जवळच **खड्गतीर्थ** आहे; दैत्यांचा संहार केल्यावर देवीनें शस्त्रें धुण्याकरितां हें स्थापिलें. कांहीं ग्रंथांत ही पार्वती असून रावणानें आत्मलिंगाबरोबर आणली व येथें नारदाचे कृतीनें कालिका होऊन राहिली असें वर्णन आहे. श्रीदेवीपूजा आश्वीन नवरात्रांत व भौमवार शुक्रवारीं देवीप्रीय आहे. अद्यापीही गोकर्ण क्षेत्रांत रोगाचा प्रादुर्भाव होतांच पूजाविधीनें देवीस संतुष्ट करतांच रोग नाश होतो. कांहीं नवस केल्यास पदरीं पुण्य असल्यास कुमारी, युवा रूपानें दर्शन होतें; नवस न फेडल्यास साक्षात्कार होतो.

६७ **रुद्रपाद्**–हें स्थान मूळ सनक महामुनींनीं स्थापीलें. नंतर पराशरानें याचा लौकीक वृद्धिंगत केला. मुख्य देवस्थानाकडून समुद्रतीरानें उत्तरेकडे जातानां सुमारें २ मैलांवर हें स्थान आहे. येथें पितृकर्में अवश्य करावीं; पितर मुक्त होतात. कन्यासंक्रांतींत पिंडदान केल्यास पितर शिवलोकीं जातात.

६८ **धर्माश्रम**–यास दुसरें नांव **धर्मकोडलु** असें आहे. हा रुद्र पादाचे देवालयापासून उत्तरेकडे गंगावली नदीपर्यंत आहे. यांत रुद्रपादाकडून गंगावलीकडे जातानां प्रथम **कपिलतीर्थ** लागतें. नंतर **अधर्म मात्सर्य, असूया, क्रोध, द्वेष, घोरता, मोहना, मेधा; सत्य, लक्ष्मी, अहिंसा, क्षमा, श्रुति, स्मृति, अक्षमा, ईर्षा, अलक्ष्मी** हीं तीर्थें आहेत; या सर्वांनीं येथें येऊन शिवव्रताचरण केलें व तीर्थें स्थापिलीं.

६९. **मेरूआश्रम**–हा गंगावली उतरून गोकर्ण क्षेत्रांत येतांच पहिला आश्रम आहे, येथें मेरूनें तप केलें. त्या ठिकाणीं उच्च शैलाग्र आहे. जवळ एक देवीचें स्थान आहे. गंगेचें देऊळ असून जवळजवळच **जन्हू, मेरू, रम्य, रमणक** हीं तीर्थेंही

आहेत. तेथें गंगेला ( शाल्मली गंगेला ) जन्हूनें तपाचरणानें जान्हवीप्रमाणें नांव मिळविलें. याच रस्त्यानें गोकर्ण ग्रामांत जातांना समुद्राचे बाजूस **कीर्ती, मान, आनंद, बुद्धि**–यांनीं तपाचरणाचे वेळीं स्थापिलेलीं तीर्थें आहेत. मेरु आश्रम एकांत स्थान आहे.

७० **युगाश्रम**–हा आश्रम गोकर्ण क्षेत्राची ईशान्य सीमा आहे. मुख्य देवालया पासून हें स्थान निदान ५।६ मैल तरी आहे. येथें **कृत, त्रेत, द्वापार, कली** यांनीं तपाचरण करून तीर्थें व **युगेश्वर** लिंग स्थापिलें. त्याची पौषमासीं रविवारीं पूजा केल्यास फार पुण्य मिळतें.

७१ **दिशाश्रम**–युगाश्रमाकडून गंगा किनाऱ्यानें येतांना हा मध्येंच आहे, यथें दिशानीं तप केलें त्यामुळें चंद्राची उत्पत्ती झाली, तपाचरणाचे वेळीं दिशांनीं स्थापलेलीं तीर्थें व लिंगें आहेत. येथें कार्तिक शु॥ १० ला पुजाविधीनें श्रीशंकराला संतुष्ट केल्यास दिग्बंधनादि सिद्धी प्राप्त होतात, येथून अग्निग्रामा(वंकीकोडलु)चे बाजूनें गोकर्णास येतानां सुमारें २ मैल प्रदेशांत **गालव, कहाळ, कनक, कण्व, रोमश, नहुष, नळ, निमि, इक्ष्वाकू, अंबरीष** यांनीं येऊन तपाचरण केलें व आपापले नावांनें तीर्थें स्थापिलीं. हीं सर्व गोकर्णाच ईशान्येस आहेत.

७२ **बाणतीर्थ**—हें बाणासुरानें तपाचरणाचे वेळीं स्थापिलें येथें आश्विन कृष्ण १४ ला पूजाविधीनें शंकर संतुष्ट केल्यास अतुल बल मिळतें.

७३ **हिंडींबातीर्थ**–कुंतीचे सांगण्यावरून हिंडिंबेनें तप करून हें तीर्थ स्थापिलें व भ्रातृवधाचा दोष वालवून भीम पति मिळविला. हें भद्रकालीचे ईशान्येस डोंगरांत आहे.

७४ **उमावन**–ह स्थान गोकर्ण क्षेत्राचें नैऋत्य टोंक आहे हें कश्यपादि आश्रमाचही पुढें आहे. उमाशंकरक्रीडास्थान आहे.

समुद्रानजीक कृत्तिका व कुंडिका नांवाचीं शैलशृंगें आहेत. येथें उमाह्रद नावाचें तीर्थ व मालिनी नदी आहे. या नदीचे कांठींच ंद्रदेव राजानें तपाचरणानें मुक्ति मिळविली. येथें कार्तिक ॥ १ ला तपाचरण, शिवपूजन केल्यास फार पुण्य मिळतें.

७५ सिद्धेश्वर–हें स्थान गोकर्ण क्षेत्राची पूर्व सीमा आहे, येथें हर्यश्व राजानें तपकरून मुक्ति मिळविली पंचलिंग स्थापनेंतीलच हें एक आहे.

येणेप्रमाणें अंतरयात्रा व बहिर्यात्रांतील मुख्यतीर्थस्थानें आहेत. पैकीं कांहीं संकुचितावस्थेंत तर कांहीं शेतजमीनींत तर कांहीं बागांतून विहिरींचे रूपानें आहेत. कांहीं तीर्थांची बरीच अनास्था दिसते. कोटीतीर्थ सर्वांहून मोठें असून ग्रामाचे मध्य-भागीं असून त्याची मुळींच अनास्था नाहीं. त्यांत स्नान करणारे आधुनिकभक्तांसही वाईट वाटणार नाहीं. श्रीरामतीर्थाची व्यवस्था चांगली असते. श्रीमहाबलेश्वर व इतर स्थापीत लिंगांचे पूजेचा प्रकार निरनिरळा नाहीं. यात्रावंतांस प्रथम तीर्थदर्शन, श्रीगणेश वंदन, नंतर महाबलेश दर्शन करून मग तीर्थस्नान, गणेश पूजा श्रीमहाबलेशपूजा, सागरदर्शन, धर्मविधी वगैरे करविण्याचा नित्यप्रचार आहे. बहुतेक लिंगें पहावयास मिळतात. ब्रम्हदेवमूर्ति छिन्नभिन्न झालेली आहे. श्रध्दावंतांनीं मनांत घेतल्यास पुनरपि लोकांस ब्रम्हदेवपूजा घडेल. सर्वतीर्थस्नानें न घडतील तर शास्त्रांत अष्टतीर्थयात्रा सांगितली आहे; ती येणेप्रमाणें:–गोकर्णदर्शन, गुह तीर्थ, ताम्रगौरी, कोटीतीर्थ, ब्रम्हकुंड, गायत्रीकुंड रामतीर्थ, सागर-ताम्रगंगासंगम या ८ तीर्थांत स्नान करून देवतादर्शन घ्यावें. श्रद्धावंत लोक सद्भावानें एकवार तरी तीर्थदर्शन, स्नान महा-बळेश्वर दर्शन करोत हा लेखकाचा हेतू श्रीगोकर्णस्थ-महाबलेश्वर पूर्ण करो.

7८६८

... ग्रंथ संग्रहालय
नं. ........
ता. ........
ठाणे.

श्रीगोकर्ण क्षेत्रवर्णन. ( भा. २ ) मराठी ४ आणे.

( क्षेत्राचे नकाशासह )

" कानडी "

श्रीगोकर्ण क्षेत्रवर्णन ( भाग १ ) ९ पै.

( संस्कृत श्लोक व गद्यपद्यासह )

लेखक :—अ. वा. जोशी पालशेतकर

एकदम ... सवलत.

REFBK-0001868

प्रिंटरः—अनंत आत्माराम गोरमकर, श्रीलक्ष्मी नारायण प्रेस,
४०२, ठाकुरद्वार मुंबई. नं. २.
प्रकाशकः—ज. वा. जोशी पालशेतकर. वरली हेन्सरोड
ओग्माची नं. ६. मुंबई.